महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबई

कल्पतरु पॉईट, २ रा मजला,
सिनेप्लॅनेटसमोर, सायन सर्कल जवळ,
सायन (पूर्व), रोड. नं. ८, सायन,
मुंबई - ४०० ०२२.

दिनांक : १७/०१/२०१०.

जावक क्रमांक : मप्रनि/लेशा/ ८०

# प रि प त्र क

विषय : वित्तीय मंजूरीसाठी प्रस्ताव मुख्य लेखा अधिकारी यांचे मार्फत पाठविण्याबाबत.

असे निदर्शनास आले आहे की, विभाग प्रमुख, प्रादेशिक अधिकारी, उप प्रादेशिक अधिकारी यांचेकडील आर्थिक बाबींचे प्रस्ताव मुख्य लेखा अधिकारी यांचा वित्तीय सल्ला न घेता परस्पर सदस्य सचिव, मा.अध्यक्ष यांचेकडे मंजूरीसाठी पाठविले जातात. यामुळे गंभीर स्वरुपाचे वित्तीय अनियमितता व त्रुटी प्रस्तावामध्ये राहून जातात. परिणामी महालेखाकार कार्यालयाकडून वित्तीय अनियमितते संदर्भात गंभीर स्वरुपाचे आक्षेप घेतले जातात. यापुढे वित्तीय बाबींचा समावेश असलेले सर्व प्रस्ताव वित्तीय सल्ला घेण्यासाठी, तसेच अंदाजपत्रके तरतुदी पडताळणीसाठी मुख्य लेखा अधिकारी यांचे मार्फत सादर करणे आवश्यक आहे व खालीलप्रमाणे दक्षता घेणे आवश्यक आहे.

१. प्रशासकिय मान्यतेसाठी पाठविले जाणारे प्रस्ताव अंदाजपत्रकिय तरतुदीसह व कामाची आवश्यकता असल्याची सबळ कारणे नमुद करुन सादर करणे आवश्यक आहे.
२. निवीदा मान्यतेचे प्रस्ताव मुळ नस्तीसह सादर करणे आवश्यक आहे.
३. मुळ नस्तीचे जतन संबंधीत कार्यालय प्रमुखाने करावयाचे आहे व आवश्यक असेल त्यावेळी मुळ नस्ती लेखा परिक्षणासाठी उपलब्ध करणे आवश्यक आहे.
४. कार्यकारी अभियंता यांनी जमिन, इमारती व वाहन खरेदी यांची अद्ययावत मत्ता नोंदवही व घसारा नोंदवही ठेवणे आवश्यक आहे व भांडार शाखेने किरकोळ सामान खरेदी, संगणक खरेदीची मत्ता नोंदवही ठेवणे आवश्यक आहे.

५. विभाग प्रमुखांकडून राबविण्यात येणाऱ्या योजना प्रकल्पा संदर्भात रकमेची मागणी करतांना यापुर्वी प्रदान केलेल्या रकमेचे उपयोगिता प्रनाणपत्र विहित नमुन्यात सादर करणे आवश्यक आहे.

६. उद्योग/संस्था/पुरवठादार यांचेकडून सुरक्षा रक्कमेपोटी बँक गॅरेंटी घेतली असल्यास दिनांक संपण्यापुर्वी बँक गॅरेंटी नुतनीकरण करणे आवश्यक आहे तसेच काही ठिकाणी अटी / शर्तीचे उल्लंघन झाल्यास वेळीच बँक गॅरेंटी रोखीकरण ( इनकॅशमेंट ) करणे आवश्यक आहे.

७. संमतीपत्र शुल्क, घनकचरा शुल्क, बायोमेडीकल शुल्क, पृथ्थ:करण शुल्क व जल उपकर शुल्क थकबाकी विवरणपत्र दरमहा मुख्य लेखा अधिकारी यांचेमार्फत सदस्य सचिव यांच्याकडे सादर करणे आवश्यक आहे व तसेच थकीत शुल्कांची/रकमांची पूर्ण वसुली विहित केलेल्या दिनांकास करणे आवश्यक आहे जेणे करुन महसुली रक्कमा वेळीच मंडळाच्या लेख्यात जमा होऊन व्याजाचे नुकसान होणार नाही.

( राधेश्याम मोपलवार )भा.प्र.से.
सदस्य सचिव

प्रति,

१. जल प्रदूषण निवारण अभियंता/हवा प्रदूषण निवारण अभियंता/प्रधान वैज्ञानिक अधिकारी
२. मुख्य लेखा अधिकारी, मुंबई/वरिष्ठ विधी अधिकारी, विधी व योजना विभाग-१.
३. वरिष्ठ वैज्ञानिक अधिकारी, मध्यवर्ती प्रयोगशाळा, निर्मलभवन, महापे, नवी मुंबई/वरिष्ठ प्रशासकिय अधिकारी, म.प्र.नि.मंडळ, मुंबई./कार्यकारी अभियंता, म.प्र.नि.मंडळ, मुंबई.
४. विधी अधिकारी, विधी शाखा/सांख्यिकी अधिकारी/लेखा अधिकारी, उपकर शाखा/सहाय्यक यंत्रणा अधिकारी/सहाय्यक लेखा अधिकारी, मुख्यालय/जनसंपर्क अधिकारी, मुख्यालय.
५. प्रादेशिक अधिकारी - घातक घनकचरा व्यवस्थापन (मुख्यालय)/प्रकल्प व योजना/प्रदूषण नियंत्रण अधिकारी विभाग-२ (PCI-ii)/समन्वय/मुंबई/नवी मुंबई/ठाणे/कल्याण/रायगड/पुणे/औरंगाबाद/नागपूर/नाशिक/कोल्हापूर/अमरावती/चंद्रपूर.
६. उप प्रादेशिक अधिकारी-मुंबई-१/मुंबई-२/मुंबई-३/मुंबई-४/ठाणे-१/ठाणे-२/तारापूर-१/तारापूर-२/नवी मुंबई-१/नवी मुंबई-२/तळोजा/प्रकल्प व योजना-१(मुख्यालय)/कल्याण-१/कल्याण-२/कल्याण-३/भिवंडी/रायगड-१/रायगड-२/रायगड-३/महाड/कोल्हापूर/सांगली/रत्नागिरी/चिपळूण/पूणे-१/पूणे-२/पिंपरी-चिंचवड/सातारा/सोलापूर/औरंगाबाद-१/औरंगाबाद-२/औरंगाबाद-३/नांदेड/नाशिक/अहमदनगर/जळगांव-१/जळगांव-२/नागपूर-१/नागपूर-२/नागपूर-३/चंद्रपूर/अमरावती-१/अमरावती-२/अकोला/परभणी/ लातूर/भंडारा/भांडार अधिक्षक.
७. वैज्ञानिक अधिकारी, प्रादेशिक प्रयोगशाळा, नागपूर/नाशिक/पूणे/औरंगाबाद/चिपळूण/ठाणे
८. परिपत्रक नस्ती-२०११.
९. पर्यावरण माहिती केंद्र (EIC)

**सदर परिपत्रक आपल्या नियंत्रणाखालील कर्मचाऱ्यांच्या निदर्शनास आणून द्यावे.**

C:\Documents and Settings\Administrator\My Documents\CAO SHINDE\circuler.doc